वाशीम पोलीस त्या बेपत्ता मुलीचा शोध लावण्यात पोलिसांना यश दि. ०२/०२/२०२०

पुण्य नगरी

# 'त्या' बेपत्ता मुलीचा शोध लावण्यात पोलिसांना यश

**वाशिम,** दि. १ (प्रतिनिधी)

शहरातून १९ जानेवारी रोजी अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाली होती.या प्रकरणी शहर पोलिसांनी गुन्हा दाखल करुन प्रकरण तपासात घेतले. दरम्यान, या मुलीचा शोध लावण्यात पोलिसांना दोन आठवड्यांनंतर यश मिळाले असून या मुलीसोबत एक अल्वयीन मुलगाही पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

शहरातील उच्चभ्रू वसाहतीमधील अल्पवयीन शाळकरी मुलीला फुस लावून पळवून नेण्यात आले. याप्रकरणी मुलीच्या पालकांनी शहर पोलिसात तक्रार दिली होती. यानुसार तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करुन प्रकरण तपासात घेतले.जिल्हा पोलिस अधीक्षक वसंत परदेशी, अपर पोलिस अधीक्षक विजयकुमार चव्हाण, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. पवन बन्सोड यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार योगिता भारद्वाज यांनी तपासासाठी पोलिसांचे विविध पथक तयार केली होती. यापथकामध्ये एएसआय गणेश सरनाईक, पोलिस नाईक प्रशांत अंभोरे, पोलीस शिपाई मनोज चव्हाण यांनी नाशिक, त्र्यंबकेश्वर, शिर्डी येथे या मुलीचा शोध घेतला. मात्र, त्यांना आढळून आले नाहीत. दरम्यान, गोपनिय माहिती मिळाल्यावरून या पथकाने शेगाव रेल्वेस्थानकांवर सापळा रचला. यावेळी सकाळच्या सुमारास आझाद हिंद एक्सप्रेसमधून सदर अल्पवयीन मुलगी व तिच्यासोबत एक अल्पवयीन मुलाला पोलिसांनी ताब्यात घेतले. या प्रकरणाचा तपास एपीआय विनोय घुईकर करीत आहेत.